महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १६५ वा | दिनांक : ०२/०४/२०२५ | वार : बुधवार

## मनीषा बिडवे हत्येप्रकरणी दोन मारेकऱ्यांना अटक



**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या अनैतिक संबंधांतून झाल्याचे दाखवण्यासाठी कळंबच्या मनीषा बिडवे नामक एका महिलेची नुकतीच हत्या झाली होती. पोलिसांनी तिच्या हत्येप्रकरणी आता २ जणांच्या मुसक्या आवळल्या आहेत. या अटकेमुळे या हत्याकांडातील महत्त्वाचे धागेदोरे हाती लागण्याची शक्यता आहे.

स्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या अनैतिक संबंधांतून झाल्याचे दाखवण्यासाठी मनीषा बिडवे नामक महिलेचा वापर केला होता. ही महिला काही दिवसांपूर्वी कळंब येथील आपल्या राहत्या घरी मृतावस्थेत आढळली. सामाजिक कार्यकर्त्या कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सोमवारी एका पोस्टद्वारे या प्रकरणाला वाचा फोडली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे मंगळवारी बीड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने या हत्येशी संबंधित २ आरोपींच्या मुसक्या आवळल्या. रामेश्वर उर्फ राण्या माधव भोसले व उस्मान गुलाब सय्यद अशी या २ आरोपींची नावे आहेत. या दोघांविरोधात कळंब पोलिसांत मंगळवारी पहाटे ५ वा. गुन्हा दाखल करण्यात आला. हे दोन्ही आरोपी बीडच्या केजचे असल्याची माहिती आहे.


अंजली दमानिया यांच्या मते, मृत महिला अनेक पुरुषांना अडकवण्याचे काम करायची आणि त्यासाठी ती मनीषा आकुसकर आडस, मनीषा बिडवे कळंब, मनीषा मनोज बियाणी कळंब, मनीषा राम उपाडे अंबाजोगाई, मनीषा संजय गोंदवले रत्नागिरी आदी विविध नावांचा वापर करत होती. विशेष म्हणजे संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर त्यांचे या महिलेशी अनैतिक संबंध होते आणि या संबंधांतूनच त्यांची हत्या झाली, असा भासवण्याचा प्रयत्न खुद्द पोलिसांकडून झाल्याचा आरोप मस्साजोगच्या नागरिकांनी केला होता.

त्यातच या महिलेचा मृतदेह सापडल्यानंतर पोलिसांनी मृतदेह कुजल्याचे कारण दाखवून हातोहात तिचे शवविच्छेदन करून तिच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले होते. त्यामुळे पोलिसांच्या भूमिकेवर संशय निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे सदर महिलेच्या शवविच्छेदन अहवालात तिच्या डोक्यावर मारण्यात आल्यामुळे तिचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे रामेश्वर उर्फ राण्या माधव भोसले व उस्मान गुलाब सय्यद या दोघांच्या अटकेमुळे या प्रकरणातील अनेक धागेदोरे स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अंजली दमानिया आपल्या पोस्टमध्ये म्हणाल्या होत्या की, गुंड संपता संपत नाहीत आणि हत्याही संपता संपत नाहीत. संतोष देशमुख यांच्यावर अनैतिक आरोप करण्यासाठी तयार करण्यात आलेली कळंब शहरातील द्वारका नगरातील एका महिलेची हत्या झाल्याचे समजत आहे. या महिलेची ७ ते ८ दिवसांपूर्वीत हत्या झाल्याची माहिती आहे. ही हत्या कोणत्या कारणाने झाली?

बीड पोलिसांना या घटनेची बातमी कळाली. त्यानंतर ते घटनास्थळी पोहोचल्यानंतरच तेथील रहिवासी व स्थानिक पोलिसांना त्याची माहिती मिळाली. याविषयी अद्याप अधिकृत माहिती समोर आली नाही. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील काही धागेदोरे हाती लागू नये म्हणून ही हत्या झाली की अनैतिक संबंधांतून झाली? अशी चर्चा सध्या सुरू आहे. पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करीत आहेत. असे असले तरी शहर आणि परिसरात या घटनेने दहशत पसरली आहे.

## दिशा सालियन प्रकरणी सुनावणीपूर्वीच न्यायमूर्तींच्या भूमिकेवर प्रश्न





**मुंबई :** दिशा सालियन मृत्यूप्रकरणी बुधवारी मुंबई उच्च न्यायालयात पहिली सुनावणी होणार आहे. या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांच्या वकिलांनी पत्रकार परिषद घेत न्यायाधीशांच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे. दरम्यान, दिशाच्या वडिलांनी आपल्या मुलीची हत्या झाल्याचा आरोप केला असून आदित्य ठाकरे यांच्यासह काही जणांवर गंभीर आरोप करत उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

दिशा सालियनच्या वडिलांचे वकील नीलेश ओझा पत्रकार परिषद घेत म्हटले, आमच्याकडून सुनावणीची पूर्ण तयारी झाली आहे, मात्र उद्या सुनावणीत काही होण्याची शक्यता कमी आहे. कारण, ज्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे ही सुनावणी होणार आहे, त्यांच्याविरोधातच आमची तक्रार आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

पुढे बोलताना वकील नीलेश ओझा म्हणाले, न्यायमूर्तींची सख्खी बहीण वंदना चव्हाण सक्रिय राजकारणी असून त्या महाविकास आघाडीच्या घटक पक्षात आहेत. त्यामुळे, विविध कारणांमुळे उद्या हे प्रकरण न्यायालयाकडूनच दुसऱ्या खंडपीठासमोर घेऊन जा, असे सांगितले जाण्याची शक्यता आहे, असा आरोप त्यांनी केला आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना नीलेश ओझा म्हणाले, दिशा सालियन प्रकरणात दिशाचे वडील सतीश सालियन यांनी १ लाख कोटींच्या मानहानीचा दावा तयार केला आहे. विशेष म्हणजे या दाव्यातून मिळणारी ९० टक्के रक्कम मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेस अनुदान म्हणून देणार असल्याची घोषणा वकील नीलेश ओझा यांनी यावेळी केली आहे. तसेच १ लाख कोटी रुपयांच्या मानधनातील उर्वरित ९ टक्के रक्कम इमानदार पत्रकारांसाठी खर्च करणार असून केवळ १ टक्का रक्कम सतीश सालियन स्वत:कडे ठेवणार आहेत, अशी माहिती ओझा यांनी दिली आहे.

## गित्ते गँगचे हे शब्द... बीड कारागृहात झाला तुफान राडा



**बीड :** *आता जिरली का तुझी की अजून जिरवायची असे म्हणत गीते गंगणे वाल्मीक कराडला दिवसले आणि गीते गँगचे हे शब्दच वाल्मीक कराडला झोंबल्यामुळे बीड कारागृहात तुफान राडा झाला अशी माहिती आहे.* बीड जिल्हा कारागृहात सोमवारी वाल्मीक कराड व सुदर्शन घुलेला मारहाण करण्यात आली. बबन गित्ते व अक्षय आठवले या दोघांनी त्यांना प्रसाद दिल्याची माहिती आहे. पण त्यानंतर महादेव गित्ते व इतर चौघांनी आम्ही त्यांना नव्हे तर त्यांनीच आम्हाला मारहाण केल्याचा दावा केला. त्यामुळे कुणी कुणाला मारले? याविषयी सस्पेन्स कायम आहे. पण आता हे प्रकरण नेमके कशामुळे घडले याविषयी नवी माहिती समोर आली आहे. त्यानुसार, गित्ते गँगने पहिल्यांदा वाल्मीक कराडची खोड काढली आणि त्यानंतर तुरुंगात हा राडा झाला असे सांगितले जात आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, बीड कारागृहात सोमवारी सकाळी नाश्त्याच्या वेळी बंदी उठवल्याने सर्व कैदी बाहेर मोकळे होते. त्यावेळी महादेव गित्ते यांच्या समर्थकांनी वाल्मीक कराडसह त्याच्या टोळीला मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येवरून टोमणे मारण्यास सुरुवात केली. आता जिरली काय तुझी? की अजून जिरायची आहे? अशी डायलॉगबाजी गित्ते गँगकडून सुरू केली गेली. यामुळे गित्ते व कराड गँगमध्ये वाद झाला. त्यात महादेव गित्ते व अक्षय आठवले हे दोघेही एकाचवेळी वाल्मीक कराडच्या अंगावर धावून गेले. तेव्हा बाजूलाच असणारा सुदर्शन घुले वाल्मीक कराडच्या मदतीसाठी धावून आल्याचे यासंबंधी सांगितले जात आहे.

या घटनेनंतर बीड जिल्ह्यात एकच खळबळ माजली. तुरुंग प्रशासनाने या प्रकरणी तोंडावर बोट ठेवत अशी कोणतीही घटना घडली नसल्याचा दावा केला. पण त्यानंतर काही वेळातच बीड कारागृहातून महादेव गित्ते याच्यासह इतर ४ आरोपींना छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात हलवण्यात आले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी अक्षय आठवलेसह मनीष क्षीरसागर व सवाई या दोघांना नाशिक कारागृहात पाठवण्यात आले. या दोन्ही घटनांमुळे बीड कारागृहात प्रत्यक्षात हाणामारी झाली होती, या वृत्ताची पुष्टी होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ एप्रिल २०२५


## महिला कला महाविद्यालयातील आय.सी.टी. क्लासरूमचे उद्घाटन




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इ. भा.पा. महिला कला महाविद्यालयातील वाणिज्य विभागात आय.सी.टी. क्लासरूमचे उद्घाटन. या कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनंदा चक्रनारायण,कार्यालयीन अधीक्षक श्रीमती अर्चना कुलकर्णी, लेखापाल श्री. मकरंद जोशी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्र. प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी विद्यार्थिनींना या क्लासरूमचा जास्तीत जास्त फायदा करून घ्यावा, असे आवाहन केले.तसेच कमीत कमी शुल्क आकारून विविध कोर्सेस चे आयोजन करण्यात येईल, ज्याचा त्यांना त्यांच्या करिअर साठी उपयोग होईल, यात माजी विद्यार्थिनींना देखील प्राधान्य देण्यात येईल,असे सांगितले व विद्यार्थिनींना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

डॉ सुनंदा चक्रनारायण, वाणिज्य विभागप्रमुख यांनी विद्यार्थिनींना परीक्षेसाठी शुभेच्छा देऊन विद्यार्थिनीं या संधीचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतील,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनंदा चक्रनारायण, डॉ. शिवाजी वाघमारे, प्रा.दत्तू लहाने, डॉ. सरिता डापके, प्रा. वरद गणोरकर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. लाजरी हजारे बी. कॉम. तृतीय वर्ष हिने केले तर आभार प्रकटन डॉ.शिवाजी वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनींची उपस्थिती होती.


## जेईएस महाविद्यालयात दोन दिवसीय परिषदेत क्रीडा विषयक मानसशास्त्र यावर मार्गदर्शन




***जालना (प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे) :** खेळाडूंनी क्रीडाविषयक मानसशास्त्र शास्त्रज्ञांचा सल्ला घेऊन खेळ खेळल्यास निश्चितच विजयाकडे वाटचाल राहील, त्यासाठी नियमित सराव व परिश्रम त्यासोबतच विश्रांती याचा ताळमेळ साधल्यास निश्चितच यश मिळेल. असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालय जालना येथे आयोजित क्रीडा व शारीरिक शिक्षण आंतरशाखीय संबंध या राष्ट्रीय चर्चासत्राच्या तिसऱ्या सत्रात मानसशास्त्र तज्ञ व कॉन्सुलर प्राध्यापिका डॉक्टर सुजाता देवरे यांनी केले जेईएस महाविद्यालयच्या क्रीडा विभाग व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर तसेच शारीरिक शिक्षण संस्था नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय क्रीडा व शारीरिक शिक्षण आंतरशाखीय संबंध बाबत राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि.२८ ते २९ मार्च २०२५रोजी करण्यात आले होते . यावेळी तिसऱ्या सत्राच्या प्रमुख व्याख्याता व मार्गदर्शक मानसशास्त्र तज्ञ व कौन्सिलर प्राध्यापिका डॉ. सुजाता देवरे ह्या होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी संत रामदास महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. बप्पा मस्के होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रशांत तौर होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राध्यापिका डॉ. सुजाता देवरे म्हणाल्या की, खेळाडूंनी खेळ खेळण्यासंदर्भात क्रीडा मानसशास्त्रज्ञांचा सल्ला घ्यावा,तान -तनाव मुक्त खेळ खेळावेत. सकारात्मक ताण चांगले असतात, परंतु निराशात्मक ताण नैराश्यकडे घेऊन जातात, खेळाडूंनी नियमित सराव करावा ,कठोर परिश्रम करावेत, तसेच विश्रांतीही घ्यावी, यामुळे मानसिक संतुलन बिघडत नाही, शारीरिक व मानसिक आरोग्यही बिघडत नाही यासाठी क्रीडाविषयक मानसशास्त्रज्ञांचा सल्ला घ्यावा. असे केल्यास खेळात निश्चितच यश प्राप्ती होते. खेळाडू व संघ विजयी होतात. क्रीडा मानसशास्त्रज्ञ डॉ.भीष्मराज बाम यांनी भारतीय संघाला योग्य मार्गदर्शन केल्यामुळेच भारतीय संघ विश्व विजेता ठरला असेही त्यांनी सांगितले. डॉ.बाम यांनी अभिनव बिंद्रा, पी व्ही सिंधू, राहुल द्रविड, एम एस धोनी, आदि, सारख्या खेळाडूंना योग्य वेळी मार्गदर्शन व कौन्सिलिंग केल्यामुळेच ते विश्वविजेते ठरले. यावेळी मानस शास्त्रज्ञ डॉ. भीष्मराज बाम यांनी लिहिलेल्या मानसशास्त्रावरील पुस्तकांचे नावे सांगून ते वाचण्याचे आव्हान ही उपस्थित खेळाडूंना प्रा.डॉ. सुजाता देवरे यांनी केले.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, क्रीडा संचालक डॉ. हेमंत वर्मा, प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे, राष्ट्रीय चर्चासत्रातील सहभागी विद्यार्थी-प्राध्यापक, खेळाडू तसेच महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री पुरुषोत्तम दायमा, प्रा. राहुल सारस्वत,श्री.विलास बोधले, श्री. धर्मेश आंबट, श्री. बबलू टेकाळे, श्री गोविंद साखरे, प्रा. सौंदर, श्री, क्षीरसागर, श्री राजेश दौड, श्री साईनाथ, श्री शामराव राठोड, आदींनी विशेष परिश्रम घेतलेत.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी जे श्रीरामे, तर उपस्थिताचे आभार डॉ. किशोर बिरकायलू यांनी मानलेत.

## राज्यात ई-बाइक टॅक्सीला परवानगी



**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत बाइक टॅक्सीला परवानगी देण्यात आली असून राज्यात केवळ ई-बाइक टॅक्सीला परवानगी असणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आला. ई-बाइक टॅक्सीसाठी राज्य सरकारच्या वतीने दहा हजार रुपये अनुदान देखील देण्यात येणार आहे. तसेच कमीत कमी खर्चात प्रवाशांना सुख सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. यासोबतच महिलांच्या सुरक्षिततेसाठी विशेष धोरण तयार करण्यात येणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत बाइक टॅक्सला मंजुरी देण्यात आली असल्याचा माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमाशी बोलताना दिली. कमी खर्चामध्ये चांगला प्रवास करता यावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र यामध्ये पेट्रोल बाइकला परवानगी देण्यात येणार नाही. तर केवळ इलेक्ट्रिक बाइकला परवानगी दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या ई-बाइक टॅक्सीमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले जाणार असल्याचेही प्रताप सरनाईक माध्यमांशी बोलताना म्हणाले. इलेक्ट्रिक बाइकला प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सरनाईक यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर रिक्षा आणि टॅक्सी चालकांना दहा हजार रुपये अनुदान देण्याचा आमचा प्रयत्न आहे. या माध्यमातून दहा हजारांपेक्षा अधिक रोजगार निर्मिती मुंबईत तर वीस हजार पेक्षा जास्त रोजगार निर्मिती ही महाराष्ट्रात होइल, असा विश्वास देखील प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ एप्रिल २०२५

# राजकारण घुसलं घरात ला अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय पुरस्कार जाहीर




**जालना :** जालना येथील कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांच्या "खूंदळा खूंदळी" अर्थात राजकारण घुसलं घरात या दोन अंकी ग्रामीण नाटकास मातंग साहित्य परिषद, पुणे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ धनंजय भिसे यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय वाड्मय पुरस्कारा करीता निवड केली आहे.गोदा प्रकाशनाचे साक्षेपी समीक्षक डॉ.दादा गोरे यांनी या ग्रंथाची निर्मिती केली आहे.आजचे ग्रामीण भागातील समाजकारण व राजकारण या षडयत्रांने संविधान विचाराची कशी पायमल्ली झाली आहे.या स्वातंत्र्याची लोकशाही कशी धायमोकलून रडतेआहे.अशी सखेद खंत हे नाटक करते आहे.अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय वाड्मय पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेश भैय्या टोपे,सौ मनीषाताई टोपे,बाबासाहेब गायकवाड,आर.जे.गायकवाड,रावसाहेब ढवळे, बसवराज कोरे, सुनील लोणकर, विठ्ठल घोडके, संतोष तांबे, शाम गायकवाड, डॉ. विजयकुमार कुमठेकर,पंढरीनाथ सारके,पंडितराव तडेगावकर, बंडू काळे, सुहास पोद्दार, कैलास इंगळे, विठ्ठल ठेपले, पुजा विश्वनाथ गायकवाड,सुहास सदावर्ते, कैलास भाले मनीष पाटील, सुंदर कुंवरपुरिया,मुकूंद दुसे, कल्याण नरवाडे,नामदेव शेळके, दिलिप मुळे,अप्पासाहेब नाटकर, अनिरुद्ध पावसे, भगवान सवळे, जालिंदर बटुळे,रमेश नाईक, नारायण वायाळ, श्रीनिवास सातभाई,भाऊ गोरे, सुनील पवार,परेश पवार,बाबासाहेब ताठे भगवान गीते,प्रकाश जायभाये,या सर्व सन्माननीय मान्यवरांनी डॉ प्रभाकर शेळके यांचे अभिनंदन केले.

# स्त्रीचे आरोग्य सुदृढ तर समाज सुदृढ - डॉ. प्रणिता म्हात्रे




**छत्रपती संभाजीरनगर :** कला महाविद्यालय बिडकीन येथे woman's Health Awerness विद्यार्थिनी समिती अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ग्रामीण रुग्णालय बिडकीनच्या मेडिकल ऑफिसर डॉ.प्रणिता म्हात्रे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन आहेर,रेड रिबन क्लब च्या प्रमुख व महिला समितीच्या अध्यक्ष डॉ. अर्चना काटकर व समिती सदस्य डॉअंजली काळे व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. अर्चना काटकर यांनी या कार्यशाळेचे नियोजन करून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व डॉ. मात्रे यांचा परिचय करून दिला. डॉ. अंजली काळे यांनी कार्यक्रमाचे नियोजनामागील भूमिका सांगून प्रास्ताविक केले.डॉ. प्रणिता म्हात्रे यांनी पहिल्या महिला डॉ.आनंदीबाई जोशी यांचा जन्मदिवस 31 मार्च हा असून त्यानिमित्ताने ही कार्यशाळा अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगत. ग्रामीण महिलांचे आरोग्य सुदृढ असण्याच्या दृष्टीने त्यांचा आहार आणि मानसिक स्वास्थ्य हे अत्यंत गरजेचे आहे असे सांगत त्यांना आरोग्याविषयी काही टिप्स देऊन स्त्रीचे आरोग्य सुदृढ तर समाज, कुटुंब सुदृढ राहील असे प्रतिपादन केले. भाषणानंतर विद्यार्थिनींशी व महिलांशी डॉ. मात्रे यांनी प्रश्नोत्तराच्या स्वरूपात संवाद साधून त्यांच्या प्रश्नांचे निराकरण केले.अध्यक्षीय समारोपात डॉ. नितीन आहेर यांनी बालिकांचे, विद्यार्थिनींचे आणि स्त्रियांचे आरोग्य हे पुरुषांच्या तुलनेने सुदृढ असत नाही अशी खंत व्यक्त करत स्त्रियांनी सकस आहार घेऊन निरोगी आयुष्य जगावे असे आपल्या भाषणात सांगितले. स्वाती शिरवत या विद्यार्थिनींनी कार्यशाळे तील सर्वांचेच आभार मानले.या एक दिवसीय कार्यशाळेसाठी महाविद्यालयाच्या परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यशाळेचा लाभ घेतला. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी डॉ.युसुफ पठाण डॉ.मुक्तार शेख डॉ.रमेश गायकवाड डॉ. प्रसाद करंदीकर प्रा. मिलिंद ठोकळे श्री. नरहरी उबाळे,श्री.संभाजी आंधळे,श्री.अण्णासाहेब थिटे, कय्यूम शेख यांचे मोलाचे सहकार्य लाभले. महाविद्यालयातील विद्यार्थि व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनगाव राजा येथे उत्साहात रमजान ईद साजरी



**प्रतिनिधी (महेश मुंढे) :** किनगाव राजा येथे रमजान ईद (ईद-उल-फित्र) मोठ्या श्रद्धा आणि उत्साहात साजरी करण्यात आली. मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र आणि आनंदाचा हा सण ३१ मार्च रोजी साजरा करण्यात आला.३० मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता चंद्रदर्शन झाल्यानंतर, किनगाव राजा येथील जामा मस्जिदचे मोलवी मियाभाई यांनी माईकवरून ईद सोमवारी सकाळी ९ वाजता साजरी होईल, अशी घोषणा केली. त्यानुसार, ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी नवीन कपडे परिधान करून मोठ्या संख्येने हजेरी लावली. काही जण पायदळ तर काही जण वाहनांवरून ईदगाहवर पोहोचले. मौलाना मियाभाई यांनी ईदची विशेष नमाज अदा केली.रमजान महिन्याच्या उपवासानंतर आलेल्या या आनंद सोहळ्यात बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले. नमाज पठणानंतर पत्रकार गजानन भाऊ काळुसे यांनी मुस्लिम बांधवांना पुष्पगुच्छ देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी फिरोज शेख, लतिफ कुरेशी, आफ्रोज शेख, अफ्रोज पठाण, फिरोज पठाण, सलीम पठाण, फारुख कुरेशी, असिफ कुरेशी, अल्ताफ कुरेशी, आसेफ पठाण, वसीम कुरेशी, लूकमान शेख, मोहसिम शेख, जावेद भाई, कदीम शेख, रहेमान शेख, सल्लुद्दीन शेख, मोजीम शेख, नाजिम शेख, उमेद पठाण, आतम पठाण, हकीम पठाण, रियाज शेख,शेख आक्रम यांच्यासह मुस्लिम समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.नमाज पठणानंतर गावभर गळाभेटी आणि शुभेच्छा देण्याचा आनंदोत्सव रंगला. लहान मुलांनी शीरखुर्म्याचा आस्वाद घेत ईदचा आनंद द्विगुणित केला.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ एप्रिल २०२५


## कृषी विभागात किरण जाधव नावाचा आका



**बीड :** भाजप आमदार सुरेश धस यांनी कृषी विभागातील लिंकिंग प्रकरणी गंभीर आरोप केले आहेत. राज्यात तीस अधिकारी असून त्यांच्या नावे ४३ कंपन्या अस्तित्वात असल्याचे सुरेश धस म्हणालेत. या कंपन्या त्यांच्या नातेवाईकांच्या नावावर तयार केल्या असून या कंपन्यांनी तयार केलेला माल लिंकिंग करून शेतकऱ्यांना बोगस बियाणे दिली आहेत, असा गंभीर आरोप सुरेश धस यांनी केला आहे. सरकारी नोकरी करताना नातेवाईकांच्या किंवा पत्नीच्या नावावर कंपन्या स्थापन करण्यात आल्या आहेत. कृषी विभागाचे प्रमुख आका किरण जाधव यांच्या काळात हजारो परवाने देण्यात आले, असेही धस यांनी म्हटले आहे.

किरण जाधव याचे अनेक डीलर मित्र आहेत. किरण जाधव आता राज्याच्या दक्षता पथकाचे प्रमुख आहे. सहा महिन्यांत पाच कोटी रुपयांचे कलेक्शन करण्यात आले, असाही आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी केला. या लोकांच्या बँक स्टेटमेंट तपासल्यास अनेक बाबी उघड होईल. राज्यात कृषिमंत्री कोणी असले तरी त्यांना शिकवण्यास हे होते, असेही सुरेश धस म्हणाले. २५ अधिकाऱ्यांनी महाराष्ट्राचे कृषी खाते खाऊन टाकले आहे. विकास पाटील आणि दिलीप झेंडे हे राज्यातले मुख्य अधिकारी आहेत. त्यांनीच प्रत्येक कृषी मंत्र्याला शिकवण दिली, असा आरोप धस यांनी केले.

प्रति कंपनी सव्वा दोन लाख ते पाच लाख रुपयांचा मलिदा लाटण्यात आलेला आहे. किरण जाधव यांच्या कालावधीत परवाना घेण्यासाठी ३ लाख रुपयांपासून ३५ लाख रुपयांपर्यंत परवान्याचा रेट लावलेला होता. महाराष्ट्रातून परवाना घेण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक कंपन्यांचे कलेक्शन या किरण जाधवकडे केले जात होते, असाही आरोप सुरेश धस यांनी केला.

कृषी खात्यात अनेक पुरवठादार कंपनी आणि अधिकारी विविध बोगस औषध आणि बियाणे शेतकऱ्यांचे माथी मारत आहेत. लिंकींगचा प्रकार वाढला आहे. कृषी विभागातील बीडच्या अधिकारी आणि कर्मचारी यांनी बदली करून देण्यासाठी मोठ्या रकमा दिल्या आहेत. बोगस कंपन्यांचा माल खपविला जात आहे. सगळ्यात जास्त बोगस बियाणांच्या कंपनी पश्चिम महाराष्ट्रात असल्याचेही सुरेश धस यांनी यावेळी सांगितले.

किरण जाधव यांनी दिलेल्या अकरा कंपन्यांचे परवाने तपासण्यात यावे. या अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी एसीबीकडून करण्यात यावी. गेल्या पंधरा वर्षातील त्यांच्या आर्थिक व्यवहाराची तपासणी आयकर विभागाकडे करण्यात यावी, अशी मागणी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार आहे, असे आमदार धस यांनी म्हटले.

## प्रशांत कोरटकरला मोठा झटका : कोल्हापूर न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला



**मुंबई :** कोल्हापुरातील इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी दिल्याप्रकरणी आणि छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अवमानकारक विधान केल्याप्रकरणी प्रशांत कोरटकरला अटक करण्यात आली आहे. दरम्यान ५ दिवसांच्या पोलिस कोठडीनंतर आता कोल्हापूर कोर्टाने प्रशांत कोरटकरला न्यायालयीन कोठडी सुनावलेली आहे. त्यानंतर कोरटकरच्या वकिलांनी जामिनासाठी अर्ज दाखल केला आहे. त्यावर आज न्यायालयात सुनावणी पार पडली.

प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज कोल्हापूर न्यायालयाने फेटाळला आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याप्रकरणी प्रशांत कोरटकरला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. यानंतर प्रशांत कोरटकरने जामिनासाठी कोल्हापूर न्यायालयाकडे अर्ज केला होता. परंतु, न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे.

आम्ही तपासामध्ये वारंवार सहकार्य करू, असे प्रशांत कोरटकरच्या वकिलाने युक्तीवाद करताना म्हटले. तर आरोपीला जामीन दिल्यास तो फरार होऊ शकतो, असा युक्तीवाद सरकारी वकिलांनी केला. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी हा एक महिना फरार होता. त्यामुळे आरोपीला जामीन देण्यात येऊ नये, असेही सरकारी वकिलांनी म्हटले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर कोल्हापूर न्यायालयाने प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज फेटाळला. यामुळे कोल्हापूर पोलिसांना या प्रकरणात तपासासाठी आणखी वेळ मिळणार आहे.

चार दिवसांपूर्वी वकील असीम सरोदे यांनी युक्तीवाद करताना म्हटले होते की, प्रशांत कोरटकर खोटारडे आहेत, हे समोर आले आहे. त्याने पुरावे नष्ट केले आहेत, हे स्पष्ट होत आहे. एका सट्टा बुकीच्या तो संपर्कात आहे. त्याची माहिती समोर येणे सुद्धा आता गरजेचे आहे. कोरटकर ६ ते ७ ठिकाणी राहिला आहे. त्यामुळे त्या त्या वेळी त्याने वेगवेगळ्या गाड्या वापरल्या आहेत. त्यामुळे त्याचा तपास गरजेचा आहे. त्यामुळे त्याला पोलिस कोठडीत ठेवणे गरजेचे आहे.

## सोन्याच्या किंमतींमध्ये प्रचंड वाढ

**मुंबई :** सोन्याच्या किंमतींमध्ये प्रचंड वाढ झाली असून, मंगळवारी दिल्ली सराफा बाजारात सोन्याने २००० रुपयांची उसळी घेत प्रति १० ग्रॅम ९४,१५० रुपये हा विक्रमी स्तर गाठला. ऑल इंडिया सर्राफा असोसिएशननुसार, गेल्या शुक्रवारी सोने ९२,१५० रुपये प्रति १० ग्रॅमवर बंद झाले होते. सलग चौथ्या दिवशी सोन्याच्या किंमतींमध्ये मजबुती दिसून येत आहे. आंतरराष्ट्रीय आर्थिक परिस्थिती, अमेरिकेतील संभाव्य टॅरिफ आणि फेडरल रिझर्व्हच्या व्याजदरांबाबतच्या अटकळींमुळे ही वाढ झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.आंतरराष्ट्रीय बाजाराचा प्रभावविश्लेषकांच्या मते, आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या किंमतींमध्ये मजबुतीमुळे देशांतर्गत बाजारावरही परिणाम झाला आहे. जागतिक बाजारात सोन्याचा भाव ३,१४९.०३ डॉलर प्रति औंसवर पोहोचला, तर कॉमेक्स गोल्ड फ्युचर्सने ३,१७७ डॉलर प्रति औंसचा विक्रमी स्तर गाठला. कोटक सिक्युरिटीजच्या मते, "अमेरिकेने सर्व व्यापारी भागीदारांवर नवे टॅरिफ लादण्याच्या शक्यतेने गुंतवणूकदारांमध्ये चिंता वाढली आहे, ज्यामुळे सोन्याची सुरक्षित गुंतवणूक म्हणून मागणी वाढली."

## संजय राऊतांचे मानसिक संतुलन बिघडल्याने भाजप द्वेषाची कावीळ झाली: चंद्रशेखर बावनकुळे



**मुंबई :** संजय राऊत यांचे मानसिक संतुलन बिघडल्याने त्याना भाजप द्वेषाची कावीळ झाला असल्याची टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. नरेंद्र मोदी हे वयाच्या ७५ व्या वर्षी निवृत्त होणार असल्याचा दावा राऊत यांनी केला होता. त्याला आता बावनकुळे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. नरेंद्र मोदी हे कधी निवृत्त होणार हे सकाळचा भोगा नाही तर देश ठरवणार असल्याचेही बावनकुळे यांनी म्हटले आहे.

या संदर्भात चंद्रशेखर बावनकुळे यांनी संजय राऊत यांनी केलेल्या टीकेवर पलटवार केला आहे. बावनकुळे यांनी एका पोस्टच्या माध्यमातून राऊत यांचा दावा खोडून काढला आहे. त्यासाठी त्यांनी अटलबिहारी वाजपेयी, मोरारजी देसाई आणि मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळाचा देखील दाखल दिला आहे.

उबाठाचे नेते संजय राऊत यांचे विधान ही केवळ राजकीय स्टंटबाजी आहे. ७५ वर्षे वयानंतर आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांनी राजकारण सोडावे, असा कोणताही नियम नाही किंवा असा कुठलाही निर्णय झालेला नाही. भाजपच्या कोणत्याही अधिकृत धोरणातही असे म्हटलेले नाही.

भारतीय संविधानातही असा कोणताही ठराव किंवा नियम नाही. भाजपचे नेते आदरणीय अटलबिहारी वाजपेयी वयाच्या ७९ वर्षांपर्यंत पंतप्रधान होते. तर मोरारजी देसाई (८३ वर्षे) आणि डॉ. मनमोहन सिंग तर वयाच्या ८१ वर्षांपर्यंत पंतप्रधान होते. पण मानसिक संतुलन बिघडल्याने भाजप द्वेषाची कावीळ झालेल्या राऊतांना हे आठवणार नाही.

भारतीय लोकशाहीत पंतप्रधानांनी कधी निवृत्त व्हायचे, हे संजय राऊत यांच्यासारख्या सकाळच्या भोंग्यावर ठरत नाही, तर निवडणुकीतील जनादेशावर आणि लोकांच्या आशीर्वादावर ठरते. पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदीजी यांचा कार्यकाळ या देशातील जनता ठरवते, संजय राऊत किंवा विरोधकांना तो अधिकार नाही.

२०४७ पर्यंत विकसित भारत करण्याचा संकल्प पंतप्रधान मोदीजींनी केला आहे. हा संकल्प त्यांच्याच नेतृत्वात पूर्ण केला जाईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवृत्तीवर बोलताना संजय राऊत म्हणाले होते की, 'स्वतः नरेंद्र मोदी यांनी एक नियम केला आहे. तो नियम त्यांना लागू होत नाही का? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. त्यांच्या पक्षात ७५ वर्ष झाल्यानंतर सत्तेच्या पदावर कोणीही राहू नये, हा त्यांचाच नियम आहे. हा नियम लालकृष्ण अडवाणी, आणि मुरली मनोहर जोशी यांच्यासह अनेक नेत्यांना लागू केला गेला. या नियमाच्या पलीकडे नरेंद्र मोदी आहेत का? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देखील या नियमाला मान्यता दिली होती. त्यामुळे यावर चर्चा करण्यासाठीच नरेंद्र मोदी संघाच्या मुख्यालयात गेले होते. आगामी १७ सप्टेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी ७५ वर्षे पूर्ण करत आहेत. त्यामुळे त्यांच्या निवृत्तीवर चर्चा करण्यासाठीच ते संघाच्या मुख्यालयात गेले, असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे.'

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ एप्रिल २०२५

# फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १०० वी शतक महोत्सवी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न



**त्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. येथे "संघटनेची ताकद कार्यकर्त्यांच्या प्रामाणिकपणा, एकनिष्ठता आणि शिस्तपालनावर अवलंबून असते." या डाॅ. बाबासाहेब आंबेडकरांच्या २६ मार्च १९५३ च्या विधानाच्या ७२ व्या वर्धापनदिनानिमित्त १०० वी शतक महोत्सवी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा २३ मार्च २०२५ ला संपन्न झाली. फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, ज्या समाजातील लोक गल्ली, विहारात, मंदिरात आपले सक्षम प्रतिनिधी निवडू शकत नाहीत, ते लोक देशाच्या संसदेत व राज्याच्या विधिमंडळात योग्य व सक्षम प्रतिनिधी कसे निवडून पाठवू शकतील? अशा समस्यांच्या गर्तेत अडकलेल्या समाजात आपण जीवन जगत आहोत.

समाज जीवनात लाखोंच्या संख्येने संघटन विरहीत संघटनांचे जाळे निर्माण झाले आहे. त्यांना संघटनेत परिवर्तित करावे लागेल. अन्यथा त्यांच्या ऊर्जा व संसाधने चुकीच्या ठिकाणी वापरली जाण्याची शक्यता आहे. कार्यकर्त्यांनी प्रामाणिक व एकनिष्ठ राहून शिस्तपालनाच्या बळावर मार्गक्रमण करण्यासाठी त्यांना प्रशिक्षित करण्याची नितांत आवश्यकता आहे.

म्हणून आपण सातत्याने विविध विषयांवर कार्यशाळेचे आयोजन करून जनतेला प्रशिक्षित करण्याचे कार्य नेटाने पार पाडत आहोत. जे या प्रशिक्षणाचा निरंतरतेने लाभ घेतील त्यांचा वैयक्तिक व संघटनात्मक विकास निश्चित होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या सत्याग्रहात If the disease is not rightly diagnosed, the remedy may be useless and the cure may be postponed. असे म्हटले होते त्याप्रमाणे आपण आपल्या समस्यांचे योग्य निदान करून त्यावर उपाय योजना केल्या पाहिजेत. आपल्या कडे समाजात करिश्मात्मक नेतृत्व (Charismatic Leadership) उपलब्ध नसले तरी सामूहिक शहाणपणाच्या (Collective Wisdom) बळावर बहुसंख्याकांच्या मताचा आदर करून होणाऱ्या निर्णयांची अंमलबजावणी करीत राहिले पाहिजे.

आपल्या सर्व समस्या निर्मूलन करण्यासाठी उपाययोजनाच्या अनुषंगाने विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षेप्रमाणे बुद्धिष्ट रिलिजियस सेमिनरीची अंमलबजावणी करून जगातील सर्व धर्माचा तौलनिक अभ्यास करावे ज्यातून येणारे सामूहिक निष्कर्ष मानवीय समाजाच्या उत्थानासाठी कसे लाभदायक असू शकतात? हे जण मानसात पटवून देण्यासाठी प्रचार व प्रसार कार्य जोमाने राबविले पाहिजे. करिता बुद्ध गया येथील महाबोधी महाविहार तर मुक्त केलेच पाहिजे परंतु आपण राहात असलेल्या नगर, कॉलनी परिसरातील विहारे कुणाच्या ताब्यात आहेत? तिथे बुद्ध विचारांच्या संवर्धनासाठी काही घडत आहे काय? बौद्ध धर्माचे लोक विहारात जातात काय? हे घडत नसेल तर यांनाही मुक्त करण्याची नितांत आवश्यकता आहे. जेणेकरून भारताचे संविधानाला अपेक्षित असणारा भारतीय समाज आपणास निर्माण करता येईल. ज्यात भारताचे संविधानाची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते दिलीप गजहंस म्हणाले की, समाजाला दिशा देण्यासाठी आज प्रबोधनाची खरी गरज आहे. पनवेलच्या हाॅटेलवर पोहोचल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महार-दलित समाजाचे असल्याचे सांगितल्याबरोबर प्यायचे पाणी सुद्धा नाकारल्या गेले. ज्यामुळे सोनबा येवले हे पाण्याचा माठ घरी जाऊन घेऊन आले होते, मात्र तोपर्यंत बाबासाहेब निघून गेले होते. आजही तिथे पाणपोई आहे, ज्यावर सोनबा येवले चे नांव कोरलेले आहे. असा जाज्वल्य इतिहास उपलब्ध आहे. करिता प्रामाणिकपणा व एकनिष्ठतेला शिस्तपालनाची जोड देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीच्या कार्याला गतिमान केले पाहिजे.

प्रमुख वक्ते अण्णाराव जाधव म्हणाले की, शासकीय अधिकारी हे चळवळीचे लाभार्थी असून सुद्धा समाजाकडे दूर्लक्ष करीत आहेत. बुद्ध काळात अनाथपिंडकाने जागा दान दिली होती. आपण बुद्धी, ताकद, वेळ, श्रम आणि पैसा या संसाधनाचा विसावा हिस्सा दान केला पाहिजे. नवीन निर्णय घेण्यासाठी बुद्ध विहारात गेले पाहिजे. पंचशीलाचे पालन केले पाहिजे. असे आपल्या अपत्यावर बिंबविले पाहिजे.

याप्रसंगी प्रतीक पंचशील म्हणाले की, शंभर कार्यशाळा घेणे एवढे सोपे काम नाही. पूर्वी उच्च शिक्षणासाठी फार कमी विद्यार्थी जायचे आज मात्र अनेकजण प्रयत्नशील आहेत. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, आपण आपल्या कुठल्याही पक्ष, संघटनेशी एकनिष्ठ नसल्याने आपली वाताहात होत आहे. शिवसेनेचे विभाजन हे एक मोठे उदाहरण आपल्या समोर आहे. सोहेल पटेल म्हणाले की, संघटनेत कुणाचेही पंख छाटण्याचे काम होऊ नये. शिस्त ही केवळ संघटनेतच नव्हे! तर कौटुंबिक, वैयक्तिक जीवनाचा अविभाज्य भाग व्हायला पाहिजे. अमित खिल्लारे म्हणाले की, प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या ताकदीवरच संघटनेची वाढ व वृद्धी होऊ शकेल. मिलिंद शेजवळ म्हणाले की, आपण स्वतःप्रती एकनिष्ठ व्हा! म्हणजे लाखो लोक आकर्षीत होऊन संघटन निर्माण होईल. अशोक मेश्राम म्हणाले की, बहुतांश भारत भ्रमण केल्यावर आपल्या सारखे शेकडो कार्यकर्ते निर्माण व्हावेत म्हणून बी. बी. मेश्राम यांनी ही प्रशिक्षण कार्यशाळा सुरू केली आहे. संतोष खरात म्हणाले की, अन्यायाच्या विरोधात संघटितपणे लढा देऊन क्रांती केली पाहिजे. टी. एन. थोरात म्हणाले की, या छोट्या कार्यशाळेतून मोठ्या विचारांच्या ज्वाला निर्माण होणार आहेत. करोडोच्या बंगल्यात राहणा-यांना सुद्धा जीवनाची दिशा मिळाली नसते. बाई आणि बाटलीच्या नादात माणसाचा -हास होतो. एड. डी. बी. मेश्राम म्हणाले की, भारतीय दलित पँथर सारखे कार्य आजही प्रासंगिक आहे.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने सर्व प्रतिनिधिंचे व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे, प्रास्ताविक व सुत्रसंचालन एड. विलास रामटेके तर आभार मिलिंद बागूल यांनी व्यक्त केले. यावेळी टी. एन. थोरात यांनी 'माझ्या भीमाची पुण्याई, आम्हा माणूसकी देई' हे तर गोविंद कांबळे यांनी 'भीमा तुझे बाळ झाले, गुलाम पुन्हा!' हे गीत सादर केले. या कार्यशाळेला उद्योजक मिलिंद बागूल, साधू आनंद, एड. विलास रामटेके, टी. एन. थोरात, अमित खिल्लारे, अण्णाराव जाधव, दिलीप गजहंस, सोहेल पटेल, एड. विलास रामटेके, चंद्रशेखर झोडे, मिलिंद शेजवळ, अशोक मेश्राम, प्रतीक पंचशील, संतोष खरात, अंकुश हिवाळे, एड. देवकांत मेश्राम, उद्योजक संग्राम घाटे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.